**प्रेसनोट दि. ११/०१/२०१८**

**ओएलएक्स या वेबसाईटवरील जाहीरात पाहुन जाहीरातीमधील मोबाईल विकत घेण्याचे बहाण्याने नांव बदलुन फसवणुक करुन मोबाईल चोरी करणाऱ्या इसमास सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी पनवेल येथुन केली अटक**

शिवाजीनगर, पुणे शहर या भागात राहणारे तक्रारदार महीलेने त्यांचा सॅमसंग नोट-४ कंपनीचा मोबाईल विक्रीसाठी ओएलएक्स ऑनलाईन खरेदी विक्री करणारे वेबसाईटवर अपलोड करुन संपर्कासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक दिला होता. त्यावरुन आदित्य मलहोत्रा नावाचे इसमाने सदर मोबाईल विकत घेण्याची तयारी दाखवुन सदर मोबाईलचे व्यवहारासाठी पाषाणकर शोरुम जेएम रोड येथील मॉडर्न कॅफेत बोलावुन सदर मोबाईल विकत घेण्याचे कबुल केले त्यावेळी त्याने त्याचे मोबाईलला रेंज नसल्याचा बहाणा करुन व महत्वाचा फोन करायचा आहे असे सांगुन त्यासाठी विश्वासाने सदर तक्रारदार महीलेकडुन त्यांचा ७०,०००/- रुपये किंमतीचा आयफोन घेतला व सदर फोन घेवुन तो तेथुन पळुन गेला सोबत त्या फोनचे कव्हरमध्ये महीलेचे ड्रायव्हींग लायसन्स व एचडीएफसी बँकेचे डेबिट कार्ड व क्रेडीट कार्ड होते ते ही तो इसमाने चोरुन नेले म्हणुन सदर महीलेने सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयात तक्रार अर्ज दिला होता. तेव्हा सायबर सेलकडून झालेल्या प्राथमिक चौकशीनंतर शिवाजीनगर पोलीस स्टेशन गु.र.नं. ३७१/२०१७ भादवि कलम ३७९,४१९, ४२० अन्वये सदर इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यांचा समांतर तपास सायबर क्राईम सेल, कडुन करण्यात आला त्यावरुन संशयीत आरोपी चे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन तसेच सदर संशयीत आरोपीने फिर्यादीशी संपर्कासाठी वापरलेले मोबाईलची तांत्रिक माहीती घेवुन सदर संशयीत आरोपी आदित्य मलहोत्रा यास पनवेल येथुन ताब्यात घेतले तेव्हा त्याचे खरे नांव विशाल हरिष शर्मा वय ३३ वर्षे रा. साईराज अपार्टमेंट, रुम नं.२०७,दुबे ग्रुप समोर, सेक्टर नं. ३, करंजाळे पनवेल, रायगड असे असल्याचे समजले. त्यास दाखल गुन्हयात अटक करुन त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेले ४ मोबाईल संच व एक एसबीआय बँकेचे डेबिट कार्ड हस्तगत करण्यात आले आहे. त्यास गुन्हयाचे पुढील कारवाईकामी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे ताब्यात देण्यात आले आहे.

प्राथमिक तपासामध्ये सदर आरोपीविरुध्द यापुर्वी रबाळे पोलीस ठाणे नवी मुंबई गुन्हा रजि. नं. ३५१/२०१३ भादंवि कलम ३८०,३४ या गुन्हयात अटक झाली होती तसेच त्याचेविरुध्द नाशिक येथील भद्रकाली पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ८८७/२०१७ भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल त्यामध्ये तो पाहीजे आरोपी असल्याबाबत माहीती प्राप्त झाली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे, सपोनि. सचिन गवते, कर्मचारी, पोना. दिपक भोसले, पोशि. किरण अब्दागिरे, पोशि. नवनाथ जाधव, पो.शि माने, म.पो.शि. शितल वानखेडे यांचे पथकाने केली आहे.

याव्दारे नागरींकाना अवाहन करण्यात येते की, मोबाईल नंबर १) ८४३३८१८९३६, २) ९८९०५९९२२७ यावरुन संपर्क करुन अशा प्रकारे फसवणुक करुन ऐवज/मोबाईल चोरी झालेल्या पिडीत/ बळीतांनी तात्काळ संबंधित पोलीस स्टेशन अथवा सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर या कार्यालयाचे ०२०.२६१२३३४६ यावर संपर्क करावा.